# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक २५० वा शनिवार दि.०९ मार्च २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# रेणापूर येथील हरिहर श्रीगणेश, हनुमान मंदिरासमोर लवकरच सभामंडप उभारणार- आ. रमेशअप्पा कराड

लातूर :- सांप्रदाय टिकला पाहिजे यासाठी सतत प्रयत्न करणारे हभप गहिनीनाथ उगिले दादा यांनी अत्यंत कष्टातून उभारलेल्या रेणापूर येथील विठ्ठल नगर भागातील हरिहर श्रीगणेश, हनुमान मंदिर परिसरात येत्या काळात निधीची तरतूद करून भव्य सभा मंडप उभारण्यात येईल अशी ग्वाही भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

रेणापूर येथील कुडके नगर, विठ्ठल नगर परिसरात गहिनीनाथ उगले दादा आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हरिहर श्री गणेश, हनुमान मंदिराची उभारणी केली. या मंदिर परिसरात नियमित विविध धार्मिक कार्यक्रम होत आहेत. या मंदिराला भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी सदिच्छा भेट दिली. मंदिर परिसराची पाहणी करून समाधान व्यक्त केले. उपस्थितांशी संवाद साधताना आ. कराड यांनी सभामंडप बांधून देण्याची घोषणा केली.

यावेळी आ. कराड समवेत भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव भागवत सोट, जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, संजय गांधी निराधार योजना अध्यक्ष वसंत करमुडे, प्रदेश भाजपाचे सतीश आंबेकर, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, माजी सभापती रमेश सोनवणे, माजी उपसभापती अनंत चव्हाण, रामराव मोरे, श्रीकृष्ण जाधव, शीला आचार्य, अनुसया फड, भाजपा शहराध्यक्ष अच्युत कातळे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

मंदिरात स्थापन केलेली पांडुरंगाची मूर्ती पहिल्यास आत्मिक समाधान मिळते असे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, आध्यात्मिक क्षेत्रात मोठी ताकद आहे. सांप्रदाय टिकावा यासाठी उगले दादा यांच्या प्रयत्नांना सहकार्य करण्यास आपण कटिबद्ध आहोत असे बोलून दाखवले.



यावेळी मंदिर समिती आणि परिसरातील नागरिकांच्या वतीने आ. कराड यांचा यथोचित सत्कार करून स्वागत करण्यात आले. प्रारंभी ह. भ. प. गहीनाथ दादा उगिले यांनी मंदिर उभारणीसह या परिसरात होत असलेल्या कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले.

याप्रसंगी भाजपाचे श्रीमंत नागरगोजे, लक्ष्मण यादव, विजय चव्हाण, दत्ता सरवदे, संतोष राठोड, अंतराम चव्हाण, राजकुमार अलापुरे, सचिन सिरसकर, मारुफ आत्तार, अजीम शेख, नंदकुमार बंडे, गणेश चव्हाण, रमेश चव्हाण, लखन आवळे, धम्मानंद घोडके, गणेश माळेगांकर, अजय मरलापल्ले, मकसुद शेख, नागेश बस्तापुरे, विकास राजे, महेश वरवटे, दत्ता बाळे, अनिल चक्रे, ज्ञानोबा कुडके, ज्ञानोबा सातपुते, अनिल गिरी, हुसेन शेख, किसन शहापुरे, गुरुपद स्वामी, दिलीप चव्हाण, शरद चव्हाण, रवी पंडित, राहुल पंडित, गंगाधर उगिले, गोविंद उगिले, संजय निलंगे, अवेज कुरेशी, सुभाष पोटे, भानुदास कुडके, सर्वर शेख यांच्यासह कुडके नगर विठ्ठल नगर परिसरातील सर्व स्तरातील नागरिक महिला पुरुष भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोहरेगाव येथील भाजपा बुथ प्रमुखाचे निधन सरवदे परिवाराचे आ. कराड यांचेकडून सांत्वन



लातूर :- भारतीय जनता पार्टीचे रेणापूर तालुक्यातील मौजे पोहरेगाव येथील बूथ प्रमुख अनिल बळीराम सरवदे यांचे दीर्घ आजाराने नुकतेच निधन झाले होते, भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी पोहरेगाव येथे त्यांच्या घरी जाऊन सरवदे परिवाराचे सांत्वन केले.

गेल्या अनेक वर्षापासून भारतीय जनता पार्टीचे एकनिष्ठ असलेले पोहरेगाव येथील कार्यकर्ते बूथ प्रमुख अनिल सरवदे हे गेल्या काही दिवसापासून आजारी होते. त्यांच्या दुःखद निधनाची माहिती मिळाल्याने भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी मंगळवारी सायंकाळी पोहरेगाव येथे घरी जाऊन सरवदे परिवाराचे सांत्वन केले. यावेळी अनिल सरवदे यांचे बंधू विनायक सरवदे, विकास सरवदे यांच्यासह परिवारातील अनेक सदस्य होते.

आ. कराड यांच्यासमवेत यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी आघाडीचे प्रदेश सचिव भागवत सोट, जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, ॲड. तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक अकनगिरे, सांगायो समिती अध्यक्ष वसंत करमुडे, सतीश आंबेकर, रमेश सोनवणे, रामराव मोरे, गंगासिंह कदम, अच्युत कातळे, प्रताप भुरे यांच्यासह अनेक जण होते तर पोहरेगाव येथील शाहूराव हांडगे, रामराव सरवदे, गणेश साळुंखे, दत्तात्रय सरवदे, विपुल चेपट, पांडुरंग सरवदे, पांडुरंग यादव, संदीप सरवदे, कालिदास सरवदे, ब्रह्मानंद शिंदे, मधुकर सरवदे यांच्यासह अनेक जण होते.



महाशिवरात्रीनिमित्त लातूर तालुक्यातील नागझरी येथील श्री नागोबा मंदिराला भेट देऊन 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी शुक्रवारी (ता. ८) मनोभावे पूजन केले. त्यानंतर आखरवाई (ता. लातूर) येथील मंदिरात जावून महादेवाचे दर्शन घेतले व आरती केली. तसेच, उपस्थित सर्व ग्रामस्थांना महाशिवरात्रीच्या शुभेच्छा दिल्या.

## शामराव सूर्यवंशी यांना कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार जाहीर

**पुरस्कार वितरण मंगळवारी १२ फेब्रुवारी तारखेला मुंबई येथे मुख्यमंत्री यांच्या हस्ते होणार आहे**

लातूर / सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामाची दखल घेऊन येथील समाजसेवक शामराव सूर्यवंशी यांना शासनाच्या वतीने देण्यात येणारा २०२१- २२ या वर्षीचा कर्मवीर पदमश्री दादासाहेब गायकवाड पुरस्कार जाहीर करण्यात आला असून याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

कर्मवीर पद्मश्री दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड यांनी रुढी परंपरेविरुध्द व अस्पृश्यतेविरुध्द सामाजिक चळवळ उभारली. भूमीहीन शेतमजूर व कामगारांसाठी देशात अनेक ठिकाणी सत्याग्रह केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांचा सिंहाचा वाटा होता. तसेच त्यांनी पुरोगामी महाराष्ट्र घडविण्यामध्ये अत्यंत मोलाची कामगिरी केली. हे कार्य विचारात घेऊन, शासनाने मागील २२ वर्षांपासून दरवर्षी कर्मवीर पद्मश्री दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड यांच्या नावाने एक व्यक्ती व एक संस्था यांना पुरस्कार देण्याचे जाहिर केले असून त्यानुषंगाने मुख्यमंत्री तथा सामाजिक न्याय विभागाचे मंत्री



यांच्या अध्यक्षतेखालील गठीत केलेल्या राज्यस्तरीय समितीने लातूर जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते, गोर गरीब, दिन दलितांच्या न्याय हक्कासाठी काम करणारे शामराव सूर्यवंशी यांना सन २०२१-२२ या वर्षांकरिता कर्मवीर पद्मश्री दादासाहेब भाऊराव कृष्णराव गायकवाड पुरस्कार प्रदान करण्यात आला असून त्यांच्या या सन्मानाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

# 'लातूर ग्रामीण'मध्ये विविध विकासकामांचे लोकार्पण

## आमदार धिरज देशमुख यांच्या हस्ते नागझरी, भोईसमुद्रा, आखरवाई येथे लोकार्पण सोहळा संपन्न

लातूर : लातूर तालुक्यातील नागझरी, भोईसमुद्रा, आखरवाई येथे विविध विकासकामांचे लोकार्पण व उद्घाटन 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते शुक्रवारी (ता. ८) करण्यात आले. या विकासकामांसाठी वेळोवेळी निधी मंजूर करून आणल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने आमदार श्री. धिरज देशमुख यांचा विशेष सत्कार यावेळी करण्यात आला. यावेळी विजय देशमुख, रविंद्र काळे, जगदीश बावणे, बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता सिद्धांत शिंदे, गोविंद बोराडे, सुभाष घोडके, वसंत उफाडे, कैलास पाटील, प्रताप पाटील, धनराज पाटील, रघुनाथ शिंदे, अनिल दरकसे, वीरसेन भोसले, बंकट कदम, अनंत बारबोले, मारुती पवार, बसवंत पवार, श्रीराम साळुंके, गफार पटेल, आत्माराम घोडके, ज्ञानेश्वर पवार, सलीम पटेल, बब्रुवान पवार, श्रीराम पवार, श्रीकिशन पवार, दत्ता पवार, शंकर पवार, बळीराम पवार, नरेश पवार, कल्याणराव देशमुख, बाबुराव देशमुख, लक्ष्मण वाघमारे, विकास देशमुख, हनुमंत गायकवाड, पद्माकर वाघमारे, बळीराम साळुंके, नाना रोंगे, कमलाकर वाघमारे, कचरू कोरे, रावसाहेब गायकवाड, महेबूब पठाण, रावसाहेब वायगावकर, संतोष तिघीले, नानासाहेब कचरे, चंद्रकांत लोखंडे, प्रकाश पाटील आदीसह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.





नागझरी येथील नागोबा मंदीर भक्त निवास बांधकामाचे आमदार श्री. धिरज देशमुख यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. मंदिराच्या भक्त निवास बांधकामासाठी ३० लक्ष रुपये, नदीघाट विकासाठी १० लक्ष रुपये, मुस्लिम कब्रस्तान रस्त्यासाठी १० लक्ष रुपयांचा निधी आमदार श्री. धिरज देशमुख यांनी मिळवून दिला. याबदल ग्रामस्थांनी त्यांचा विशेष सत्कार यावेळी केला. आमदार श्री. धिरज देशमुख यांच्या पाठपुराव्यामुळे भोईसमुद्रा येथे नूतन तलाठी कार्यालय तसेच पेव्हर ब्लॉक कामासाठी सरकारने निधी मंजूर केला होता. या दोन्ही विकासकामांचे आमदार श्री. धिरज देशमुख यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. ही कामे वेळेत करावीत. तसेच, गावातील प्रगतीपथावर असलेली इतर विकासकामे आचारसंहितेपूर्वी पूर्ण करा, अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. गावातील विठ्ठल रुक्मिणी मंदिर सभागृहासाठी ७ लाख, जिल्हा परिषद शाळेतील क्रीडा साहित्य खरेदीसाठी १ लाख, जनसुविधेतून ३ लाख, गावांतर्गत पथदिवे ३ लाख, इंदिरा नगरमध्ये विद्युतीकरणासाठी २ लाख, अंगणवाडी दुरूस्तीसाठी १ लाख, नानासाहेब रोंगे डीपीसाठी ३ लाख ४६ हजार रुपये, मुलभूत सुविधेतून १० लाख रुपये तसेच कोल्हापुरी बंधारे दुरुस्ती, गेट बसविणे, गावांतर्गत सिमेंट, पेव्हर ब्लॉक रस्त्यासाठी मिळून जवळपास ६८ लाख रुपयांचा निधी गावाच्या विकासासाठी आम्ही उपलब्ध करून दिला. नवीन तलाठी कार्यालयासाठी २० लाख रुपये मंजूर करून आणले. विकासाचा हा आलेख असाच कायम राहील, अशी ग्वाही आमदार श्री. धिरज देशमुख यांनी दिली.

आखरवाई (ता. लातूर) येथील १ कोटी ३४ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे आमदार श्री. धिरज देशमुख यांच्या हस्ते आज लोकार्पण करण्यात आले. पाणीपुरवठा विहीर व पाईपलाईन जलसुविधेसाठी ६९ लाख, मातोश्री शिवरस्ता ४० लाख, गावांतर्गत काँक्रीट आणि पेव्हर ब्लॉक रस्ते व नालीसाठी १५ लाख, आमदार निधीतून कॉक्रीट रस्ता व नालीकामासाठी १० लाख रुपयांच्या विविध विकासकामांसाठी निधी आणून गावाच्या विकासात योगदान दिल्याबद्दल ग्रामस्थांनी आमदार श्री. धिरज देशमुख यांचे आभार मानून त्यांचा जाहीर सत्कार यावेळी केला.

भरघोस निधी खेचून आणला महाविकास आघाडी सरकारमध्ये अमित विलासराव देशमुख हे आपल्या हक्काचे मंत्री होते. त्यामुळे त्यांच्या माध्यमातून लातूर ग्रामीण मतदारसंघासाठी भरघोस निधी खेचून आणता आला. त्यावेळी मंजूर झालेल्या निधीतून आपल्या मतदारसंघात अनेक विकासकामे सुरू झाली. यापुढेही गावांच्या मागणीप्रमाणे अशीच विकासकामे करत राहू, असा विश्वास आमदार श्री. धिरज देशमुख यांनी व्यक्त केला.

देशाच्या विकासासाठी काँग्रेसचे हात बळकट करा

राज्यात, देशात विकासकामांऐवजी केवळ राजकारण केले जात आहे. शेतकरी, युवक, महिला, सर्वसामान्य नागरिक यांच्या विकासाचे फसवे चित्र रंगवले जात आहे. एक सुजाण, जागरूक नागरिक म्हणून हे फसवे चित्र पुसून काढण्याचे, सत्ताधाऱ्यांना धडा शिकवण्याचे काम येत्या लोकसभा निवडणुकीत आपण करावे. काँग्रेसनेच देशाचा विकास केला आणि यापुढेही काँग्रेसच देशाचा विकास करू शकते. त्यामुळे सध्याची निराशाजनक व्यवस्था बदलून देशाचा विकास साधण्यासाठी आपण सर्वांनी काँग्रेस पक्षाचे हात बळकट करावेत. आपल्या उमेदवाराच्या पाठीमागे खंबीरपणे उभे रहावे, असे आवाहन आमदार श्री. धिरज देशमुख यांनी केले.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# महिला आजही न्यायाच्या प्रतीक्षेतच..!

– अॅड. रमा सरोदे केवळ कायदा आला म्हणजे प्रश्न सुटले असे होत नाही. कायद्यांचा आधार घेऊन प्रत्यक्ष पीडित महिलेला न्याय मिळण्यापर्यंतची प्रक्रिया महिलांसाठी अनुकूल आहे का, संवेदनशील, अनुभवी, लिंगभेदविरहित आहे का, याचा विचार केला गेला पाहिजे. ती तशी नसेल तर कायदे हे कागदावरच राहतील. त्यांचा आधार घेऊन महिलांना न्याय मिळू शकणार नाही. ८ मार्च हा जागतिक महिला दिन. त्यानिमित्ताने.आपल्याकडे महिलांचे प्रश्न हे पूर्वीपासूनच दुर्लक्षित राहिलेले आहेत. त्यांना कधीही प्राधान्य दिले नाही. कालौघात जसजशा घटना घडत गेल्या, त्या घटनांनुरूप किंवा त्या घटनांना प्रतिसाद देण्यासाठी म्हणून काही कायद्यांमध्ये बदल केले. बदलत्या काळातील महिलांच्या प्रश्नांसंदर्भात काही धोरण ठरवण्यासाठी वा कायदा करण्यासाठी म्हणून हे बदल केले गेले नाहीत. थोडक्यात, त्यामागे खूप दूरदृष्टी होती अथवा महिलांचा विचार होता असे नाही. महिलांचे हक्क हे मानवी हक्क आहेत, हे सिद्ध करण्यासाठी आणि स्वीकारण्यासाठी एक काळ ओलांडावा लागला. ७५ नंतरचे दशक हे आंतरराष्ट्रीय पातळीवरही 'महिलांचे दशक' मानले गेले. त्यादरम्यान अनेक परिषदा झाल्या, काही घडामोडी घडल्या. जागतिक स्तरावर आणि भारतीय स्तरावर घडणार्या या घटना समजून घेणे आवश्यक आहे. १९७९ मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर 'सिडॉ'चा करारनामा (कन्व्हेन्शन टू एलिमिनेशन ऑफ ऑल फॉर्मस् ऑफ डिस्क्रिमिनेशन अगेन्स्ट वूमेन) झाला. यानुसार महिलांवर होणार्या भेदभावाच्या प्रत्येक गोष्टी आपण दूर करू शकलो पाहिजे, असे उद्दिष्ट ठेवले गेले. १९८३ मध्ये भारताने त्याचा स्वीकार केला. त्यानंतरच भारतामध्ये खर्या अर्थाने महिलांसंदर्भातील कायदे झाले. '४९८ अ'चा कायदा आणि '३०४ ब'चा कायदा हा १९८३ मध्ये झालेल्या दुरुस्तीने आपण आणलेला आहे. त्यामागची कारणे काय होती? तर सत्तरीच्या दशकामध्ये नवीन लग्न झालेल्या महिलांच्या मृत्यूचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणावर वाढले असल्याचे लक्षात यायला लागले. यामागे हुंडाबळी आणि शारीरिक व मानसिक छळ ही दोन प्रमुख कारणे असल्याचे दिसून आले. अशा घटनांमध्ये पीडित महिलेचा मृत्यू झाल्यानंतर संबंधितांवर खुनाचा खटला चालवण्याऐवजी अशा प्रकारे मानसिक छळ करणे वा हुंड्यासाठी त्रास देणे ही हिंसा आहे, असे मानून खटला चालवला जावा. ही हिंसा जर समोर आली तर मृत्यू टाळता येतील, असा विचार पुढे आला. या विचारातूनच किंवा असे मृत्यू टाळण्याच्या उद्देशानेच '४९८– अ'ची निर्मिती झाली. पूर्वी कौटुंबिक हिंसाचार हे चार भिंतींच्या आतमध्ये होत असत, त्यामुळे बोलले जात नव्हते किंवा बोलले जाऊ नये, असे मानले जात होते; पण या कायद्यामुळे हे गृहितक बदलले आणि हा केवळ चार भिंतींच्या आतमध्ये घडणारा प्रकार नसून, तो एक सामाजिक प्रश्न आहे आणि सर्वांनी चर्चा करून तो थांबवला पाहिजे, असे ठरवले. अशाच प्रकारे विवाहानंतर ७ वर्षांच्या आत जर विवाहित महिलेचा अनैसर्गिक आणि संशयास्पद मृत्यू झाला, तर तो हुंड्यासाठी झाला आहे हे गृहीत धरले पाहिजे, असे '३०४ ब'नुसार ठरवले गेले. हे दोन्ही कायदे साधारणपणे एकाच कालावधीत आल्यामुळे या दोन्हींमध्ये एक गफलतही होऊ लागली. म्हणजे, '४९८ अ' हे केवळ हुंडा मागितला तरच लागू होते, असा कुठेतरी एक समज झाला होता; पण त्यापलीकडेही विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केला जातो आणि त्यासाठी हा कायदा आहे, हे हळूहळू लक्षात आले. असे असले तरी या कायद्यामागची भावना समजून न घेता संकुचित विचार ठेवून या कायद्यांचा अर्थ लावला जातो. दुर्दैवाने, आज महिला तितक्या संघटित नसल्यामुळे त्यांचा आवाज समाजापर्यंत जोरकसपणे पोहोचू शकत नाही. याउलट यासंदर्भात पुरुषांचे संघटन अधिक व्यापक आहे. त्यांच्या हातात आर्थिक नाड्या आहेत. माध्यमांसमोर ते सातत्याने त्यांचे प्रश्न मांडत असतात. त्यातून एकांगी बाजू समाजासमोर येत आहे. आज महिलांचे प्रश्न समजून घेण्यासाठी अधिकारकेंद्री दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. तसेच त्यांच्या समस्या जाणून घेताना 'बिटविन द लाईन्स' समजून घेण्यासाठी संवेदनशीलता असणे गरजेचे आहे. त्यासाठी एम्पथी म्हणजे सहानुभूती असणे आवश्यक आहे. ती नसल्यामुळे किंवा अतिशय कमी प्रमाणात असल्यामुळे कायदे करूनही वर्षानुवर्षे महिलांच्या समस्या प्रलंबित राहिलेल्या आहेत. बलात्काराच्या प्रकरणामध्ये, कामाच्या ठिकाणी होणार्या लैंगिक शोषणाच्या प्रकरणांमध्ये हाच प्रकार दिसून येतो. त्यामुळे खर्या अर्थाने समानता आणायची असेल तर पितृप्रधान अथवा मातृप्रधान अशी संस्कृती न आणता समतेच्या दिशेने जाणारा समाज निर्माण होणे गरजेचे आहे. घराघरांमध्ये समतेची वागणूक व्यवहारातूनच दिसून आली पाहिजे.बरेचदा ही गोष्ट शिकवता येत नाही. ते अंगिकरणच करावे लागते. ते जगण्याचे मूल्य आहे. ते स्वीकारावे लागते. ते स्वीकारले गेले तर समाजात संवेदनशीलता निर्माण होण्यास सुरुवात होईल आणि त्यातून समतेच्या दिशेने आपण वाटचाल करू लागू. आज आपल्याकडे स्त्रियांसंदर्भातील समस्यांवर बोलताना वा आंदोलने करताना नेहमी कायदे करण्याची किंवा कायद्यांमध्ये बदल करण्याची, ते अधिक कठोर करण्याची भाषा केली जाते; परंतु केवळ कायदे करून चालणार नाही, तर ते राबवणारी यंत्रणा तितकीच संवेदनशील आणि 'जेंडर सेन्सटाईज' असली पाहिजे. तसेच त्यांना वास्तवाचे भान असले पाहिजे. आमच्या घरात कौटुंबिक हिंसाचार होत नाहीत, आमच्या घरातील मुलींबाबत असे प्रकार कधी होत नाहीत, आमच्या घरातील कोणत्याही मुलीवर बलात्कार होणार नाही; कारण आमच्या मुली सुसंस्कृत आहेत, त्या कधीच तोकडे कपडे घालून रात्रीच्या वेळी बाहेर जात नाहीत, असा स्वतःच्या दृष्टिकोनातून विचार यंत्रणेतील व्यक्तींनी करता कामा नये; कारण त्या गोष्टी व्यक्तिगत आहेत. त्यांचा समाजातील वास्तवाशी मुळातच संबंध नाही.

# प्रस्थापितांच्या आट्यापाट्या

– कल्पना चावला, पहिली भारतीय महिला अंतराळवीर तंत्रविज्ञानाचा प्रचंड वेग असो, महासाथीच्या संकटाने जगभरातील शासनसंस्थांची उडवलेली भंबेरी असो, हवामान बदलाचे तीव्र होत जाणारे संकट असो, वा युद्धखोरांनी मांडलेला रक्तपाताचा क्रूर खेळ असो; जग अनेकपदरी आव्हानांच्या आवर्तात सापडल्यासारखे वाटते आहे.खरे तर अशीच वेळ असते, जेव्हा आशावादी मनाला नव्या नेतृत्वाची आस लागलेली असते. तसे घडण्याची सर्वाधिक शक्यता असते ती लोकशाही व्यवस्थेत. परंतु अमेरिकेत सध्या तरी त्यावर पाणी ओतले गेले आहे.रिपब्लिकन पक्षाची उमेदवारी मिळविण्यासाठी अमेरिकेच्या संयुक्त राष्ट्रांमधील माजी राजदूत व माजी गव्हर्नर निकी हॅले या ट्रम्प यांच्याविरोधात उभ्या राहिल्या होत्या. परंतु प्राथमिक फेऱ्यांत बहुतांश ठिकाणी ट्रम्प यांनी त्यांच्यावर मात केली.त्यानंतर महासत्तेच्या अध्यक्षपदासाठी पुन्हा एकदा ट्रम्प आणि विद्यमान अध्यक्ष, डेमोक्रॅटिक पक्षाचे संभाव्य उमेदवार ज्यो बायडेन यांच्यातच लढत होणार हे स्पष्ट दिसते. फक्त शिक्कामोर्तब बाकी आहे.सलग दुसऱ्या निवडणुकीत आधीचेच प्रतिस्पर्धी पुन्हा मैदानात उतरण्याची १९५६नंतरची ही पहिलीच वेळ ठरेल. ७७वर्षीय ट्रम्प आणि ८१वर्षीय बायडेन यांच्यातून अमेरिकेला अध्यक्ष निवडायचा आहे. अर्थात त्यांच्या प्रस्थापितपणाचा मुद्दा केवळ वयापुरता मर्यदित नाही.हे दोघेही काय करू पाहतात आणि काय करू शकतात, या दोन्ही गोष्टी अमेरिकेला आणि जगालाही अनुभवायला मिळाल्या आहेत. त्यांचे कार्यक्रम, भूमिका जगजाहीर आहेत. त्यांच्या या बसलेल्या घडीला चांगल्या अर्थाने धक्का देणारे कोणी तेवढ्या प्रभावीपणे पुढे येऊ शकलेले नाही.याची कारणे शोधावी लागतील. राजकीय प्रक्रियेविषयीच औदासीन्य वा नैराश्य निर्माण होण्याचा धोका सर्वच लोकशाही व्यवस्थांपुढे असतो. तसे काही महासत्तेतही होत आहे का, हे पाहावे लागेल.मागच्या, म्हणजेच २०२०मध्ये झालेल्या निवडणुकीतील पराभव ट्रम्प यांना पचवता आला नव्हता. त्यांच्या समर्थकांनी थेट 'कॅपिटॉल हिल्स'वर हल्ला केला. त्याला ट्रम्प यांचीच चिथावणी असल्याचा आरोप आहे. त्यावरून कोर्टबाजीही झाली.ते अध्यक्षीय निवडणूक लढवू शकतील का याविषयीच शंका होती. पण तूर्त त्या सगळ्या फोल ठरवत ट्रम्प शड्डू ठोकत आहेत. ''सर्व महत्त्वाच्या विषयांवर बायडेन यांच्याशी आत्ताच जाहीर वाद करायला आपण तयार आहोत'', असे सांगून आपला आत्मविश्वासदेखील सर्व सीमा ओलांडून कसा बेफाम धावत आहे, हे त्यांनी दाखवून दिले आहे. पराभव झाल्यानंतरही ट्रम्प कधीच पडद्याआड गेले नाहीत. भल्या–बुऱ्या कारणांनी प्रसिद्धीच्या झोतात राहिले. विविध आरोप आणि खटले यामुळेही चर्चेत राहिले. स्थलांतरितांविरोधात मूळ अमेरिकी नागरिकांच्या मनातल्या असंतोषाचा उपयोग करून घेत ते रान उठवत आहेत. मेक्सिकोच्या सीमेवरील भिंत हे त्याचे प्रतीक आहे. सर्व प्रकारच्या आयातीवर सरसकट कर लावू, कंपनीकर २१वरून १५ टक्क्यांवर आणू, प्रदूषणनियमांच्या 'जाचा'तून वाहनउद्योगाची मुक्तता करू, इतर देशांच्या संरक्षणाचे नसते ओझे डोक्यावर घेणार नाही, अशा गोष्टी ट्रम्प करत आहेत.त्यांनी कट्टर राष्ट्रवादाचा आधार घेतला आहे. ज्या तत्त्वाची अमेरिकी राज्यकर्ते वर्षानुवर्षे भलामण करीत होते, देशोदेशीच्या सत्ताधाऱ्यांना आणि जनतेला दारे–खिडक्या उघडण्याचा उपदेश करीत होते, त्या 'खुल्या व्यापाराच्या तत्त्वा'ला सांगूनसवरून हरताळ फासण्याची भूमिका ट्रम्प घेत आहेत.त्यांच्याविरोधात उभ्या असलेल्या विद्यमान अध्यक्षांची भाषा निश्चितच वेगळी आहे. आम्ही विभाजन घडवू पाहणाऱ्यांविरोधात आहोत. समावेशक धोरणे आखून अमेरिकेतील दुभंग रोखू, असा निर्वाळा बायडेन देतात.पण भाषा वेगळी असली तरी त्यांचा कारभार काय सांगतो? जगाला अस्थिरतेच्या खाईत लोटणारी रशिया–युक्रेन आणि इस्त्राईल–हमास ही दोन मोठी युद्धे दीर्घकाळ सुरू आहेत. त्याने पुरवठासाखळ्या विस्कळित केल्याने अनेक गरीब देशांना फटका बसला आहे.अनेक विकसनशील देश आपापल्या अर्थव्यवस्था सावरण्याच्या प्रयत्नांत असताना त्या प्रयत्नांमध्ये खीळ निर्माण झाली आहे. चीनबरोबरच्या व्यापारातील अडथळे दूर करण्यातही बायडेन यशस्वी ठरलेले नाहीत.अशी परिस्थिती असल्यानेच अमेरिकेतील प्रस्थापितांच्या आट्यापाट्यांमधून काय बाहेर पडणार, असा प्रश्न केवळ अमेरिकेतील जनतेलाच नव्हे तर जागतिक समुदायालाही पडला तर आश्चर्य वाटू नये.युक्रेनसारख्या देशांना आर्थिक, लष्करी मदतीचा अमेरिकेकडून अव्याहत सुरू असलेला ओघ ट्रम्प सत्तेवर आल्यास थांबेल आणि पर्यायाने युद्ध संपुष्टात येईल, अशी आशा आहे. कदाचित ती फलद्रुप होईलही; परंतु जागतिक स्थैर्य आणि शांततेच्या उद्दिष्टासाठी नव्हे तर एक प्रकारच्या अपरिहार्यतेतून हे घडेल. त्यातून दीर्घकालीन शांतता निर्माण होईल का, हा प्रश्न आहेच.ट्रम्प उघडउघड कट्टर भूमिका घेऊन मैदानात उतरत आहेत आणि यांच्यापेक्षा भाषा वेगळी असली तरी ज्यो बायडेन यांचा कारभार उत्साह वाटावा, असा नाही.



# प्राणीजन्य नवीन आजारांत वाढीचे संकट

डॉ. व्यंकटराव घोरपडे वातावरणातील बदल आणि त्याचे परिणाम हे आता स्थानिक न राहता त्यांनी वैश्विक रूप धारण केले आहे. २००७च्या इंटरनॅशनल पॅनल ऑन क्लायमेट चेंजच्या (आयपीसीसी) अहवालानुसार या जागतिक तापमानवाढीमुळे अनेक संसर्गजन्य आजार वाढतील.त्याचा प्रसार खूप वेगाने होईल. परिणामी मोठ्या प्रमाणात प्राण्यांचे, पशुधनांचे स्थलांतर होईल. प्राणीजन्य उत्पादनावर, प्राणीजन्य उत्पादनाच्या बाजारावर देखील परिणाम होतील. सोबत शेती व शेती उत्पादनासह त्याच्या वापरावर



देखील त्याचा परिणाम होईल, असे नमूद केले आहे.इबोला, सार्स, मंकी पॉक्स, कर्नाटक राज्यात नुकत्याच धुमाकूळ घातलेल्या मंकी फिव्हर आजाराचे ३४ रुग्ण हे उत्तर कन्नड जिल्ह्यात आढळले आहेत. त्याला 'कायसनूर फॉरेस्ट डिसीज'देखील (केएफडी) म्हणतात.त्यामुळे जानेवारी २०२४ मध्ये दोन मृत्यू देखील झाले आहेत. अशा अनेक नवीन प्राणीजन्य आजाराची संख्या वाढत जाणार, हे निश्चित! मग त्याचा अप्रत्यक्ष परिणाम हा देशाची अर्थव्यवस्था, सार्वजनिक आरोग्य, संबंधित प्राण्यांचे संरक्षण यावर होणार आहे.अनेक प्राणीजन्य आजार हे नवीन आहेत. त्या रोगांचे कारण असणाऱ्या रोगजंतूंबाबत व त्यांच्यावर होणाऱ्या वातावरण बदलाच्या परिणामाबाबत अजूनही म्हणावे असे संशोधन उपलब्ध नाही.कारणीभूत असणाऱ्या रोगप्रसारक माध्यम किटकांबाबत देखील संशोधन व्हायला हवे. त्यांचे निवासस्थान, हालचाल, अचानक संख्येत होणारी वाढ देखील महत्त्वाची आहे. वाढीव पर्जन्यमानामुळे देखील परोपजीवी कीटक, जंत यांचा प्रादुर्भाव अचानक वाढतो. त्यामुळे जंगली प्राण्यांसह जवळपास असणाऱ्या पाळीव प्राण्यांमध्ये त्यांचे संक्रमण होते व आजार वाढीस मदत होते.प्राणी आणि मानवातील रोगांच्या स्वरुपातील बदल हा हवामान बदलाचा परिणाम आहे. सध्या असणारे रोग व नवीन येणारे रोग त्याचा प्रसार, तीव्रता यामध्ये वारंवार बदल होत असतात. अलीकडे महाराष्ट्रात संकरित विशेषतः देशी गायींमध्ये 'लम्पी स्किन डिसीज'ने धुमाकूळ घातला होता.लसीकरण व वेगवेगळ्या उपायांनी साथ आटोक्यात आणत असताना जरा कुठे प्रमाण कमी होत आहे अशी आकडेवारीमुळे समोर येतानाच अवकाळी पाऊस, उन्हाळी पाऊस व्हायचा त्यावेळी पुन्हा दलदल, पाण्याची डबकी यामध्ये वाढ व्हायची.परिणामी योग्य पोषक वातावरण निर्माण झाले की, विषाणू वाहक डास, माशा, चिलटे या रोगप्रसारक माध्यम कीटकांच्या संख्येत वाढ होऊन पुन्हा प्रसार वेगाने झालेले आपण अनुभवले आहे. त्यामुळे अशा हवामानातील बदलाचा परिणाम हा रोगप्रसारक माध्यम कीटकांच्या संख्येत वाढ व त्यांच्या अनुवंशिकतेतील बदल हे एकूण रोगप्रसारणास कारणीभूत ठरतात.'आयपीसीसी'च्या तिसऱ्या मूल्यांकन अहवालात प्राणीजन्य उत्पादनावर होणारा तापमान वाढीचा परिणाम यावर थेट भाष्य केले आहे. प्राणी, पशुधन यांच्यातील सभोवतालच्या उष्णतेची जी देवाणघेवाण होते त्यावर वातावरणातील तापमान वाढ, आर्द्रता,वाऱ्यांची दिशा याचा प्रभाव पडतो. त्यामुळे प्राणीजन्य उत्पादने दूध, लोकर यासह दूध उत्पादन व पुनरुत्पादन यावर देखील परिणाम होतो. अनेक प्रजाती प्रजनन आणि अन्नाच्या शोधात स्थलांतरित होत असतात. तापमान वाढीमुळे अधिवास नष्ट होतात, स्थलांतर थांबते. परिणामी अनेक प्रजाती या नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.वाढीव उत्पादन घेण्याच्या अट्टहासामुळे देखील नवनवीन रोगांचा प्रादुर्भाव वाढत जातो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात व्यवस्थापनातील बदल देखील करावे लागतात. राज्यात विशेषतः गोचिडांच्या प्रादुर्भावामुळे वाढत असणारे थायलेरिओसिस,बबेसिओसिस सारखे आजार याची उदाहरणे आहेत. उबदार हिवाळा असेल तर प्रचंड प्रमाणात गोचीड वाढतात. या रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रसार वाढतो. वेळीच उपचार मिळाले नाहीत तर पशुपालकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. एकूणच अशा या वातावरणाच्या बदलामुळे पर्यावरणीय स्त्रोत व संपर्क यामध्ये बदल होत असतात. रोगप्रसारक माध्यम कीटकांना मोठ्या प्रमाणात अनुकूल वातावरण उपलब्ध झाल्यामुळे त्यांच्यात वाढ होऊन रोगप्रसार वाढीस लागतो.एकूणच पशुसंवर्धन धोरण, पशुधनांची उत्पादकता सोबत पशुवैद्यकीय सेवा–मदत यामध्ये बदल करून योग्य तो मुकाबला निश्चित करता येईल. पशुसंवर्धनासह इतर सर्व यंत्रणांची वाढ व विस्तार, त्यातून गरिबीशी लढा योग्य पद्धतीने देता येईल, अशा धोरणाच्या अंमलबजावणीने हे साध्य होईल.

# रेणापूर ते घनसरगाव मार्गावरील पुलामुळे विकासाला नवी चालना मिळेल

## आमदार धिरज देशमुख यांच्या हस्ते पुलाचे उद्घाटन; महाविकास आघाडी सत्तेत असताना मिळाला होता निधी

लातूर : महाविकास आघाडी सत्तेत असताना मिळालेल्या निधीतून रेणापूर ते घनसरगाव मार्गावरील रेणा नदीवर उभारलेल्या मोठ्या पुलाच्या निर्मितीमुळे ग्रामस्थांच्या दळणवळणाच्या समस्या सुटल्या आहेत. त्यामुळे या भागातील विकासाला आता नवी चालना मिळेल, असा विश्वास 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी व्यक्त केला. लातूर ग्रामीण मतदारसंघात रेणापूर ते घनसरगाव या मार्गावरील रेणा नदीवर मोठा पूल उभारण्यात आला असून या पुलाचे आमदार श्री. धिरज देशमुख यांच्या हस्ते नुकतेच उद्घाटन झाले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी सर्जेराव मोरे, प्रमोद जाधव, उमाकांत खलंग्रे, अनुप शेळके, अनंतराव देशमुख, रमेश सूर्यवंशी, शेषराव हाके पाटील, कॉन्ट्रॅक्टर मलवाड, रघुनाथ शिंदे, हणमंत पवार, प्रमोद कापसे, प्रवीण माने, विश्वनाथ कागले, सुरेंद्र शिंदे, प्रदीप देशमुख, प्रताप देशमुख, पृथ्वीराज देशमुख, दत्ता डिगोले, अनंतराव शिंदे, प्रकाश कांबळे, प्रदीप कापसे, चंद्रकांत पवार, महादु आडसूळे, आकाश पाटील, धनराज सुर्यवंशी, बाळासाहेब शिंदे, दत्तू शहापूरे, बबलू शिंदे, बाळासाहेब सुर्यवंशी, राजेभाऊ पवार, युसूफ पठाण, अविनाश पाटील, प्रमोद देशमुख, संतोष शिंदे, गोपाळ नाना शिंदे, अनंत चव्हाण, माऊली डिघोळे, सचिन इगे, प्रमोद काळे उपस्थित होते. पावसाळ्यात येथील रस्ता पाण्याखाली जात असल्याने ग्रामस्थांना



हणमंतवाडी मार्गे ११ किलोमीटर फिरून गाव गाठावे लागत होते. त्यामुळे अनेकांची गैरसोय होत होती. या परिस्थितीची दखल घेवून आणि या परिसरातील ग्रामस्थांचे म्हणणे विचारात घेवून येथे मोठा पुल उभारला जावा यासाठी तत्कालीन महाविकास आघाडी सरकारकडे आमदार श्री. धिरज देशमुख यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यामुळे या पुलाच्या बांधकामासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजना एडीबी टप्पा २ अंतर्गत मान्यता मिळाली व ४०.५५ मीटर लांबीच्या या पुलासाठी २ कोटी १० लाख रुपये (मुग्रायो - २०२०/ प्र. क्र. ४३०/ बांधकाम -४) १ मार्च २०२१ रोजी मंजूर झाले. तत्कालीन ग्रामविकास मंत्री श्री. हसन मुश्रीफ यांनी निधीला मंजुरी दिली. म्हणूनच घनसरगाव, रेणापूर या गावांना जोडणारा हा पूल आकाराला आला. या पुलाच्या बांधकामाची आमदार श्री. धिरज देशमुख यांनी प्रत्यक्ष वेळोवेळी पाहणी केली. आवश्यक सूचना केल्या. या सर्व प्रयत्नांतून हे पूल उभारले गेले आहे. ग्रामस्थांकडून धिरज देशमुख यांचा सत्कार रेणापूर ते घनसरगाव या मार्गावरील पुलामुळे आता ग्रामस्थांना जवळचा मार्ग उपलब्ध झाला आहे. शेतीमालाची ने-आण करणारे, दुग्ध व्यावसायिक, विद्यार्थी, रुग्ण, वाहनचालक, ग्रामस्थ यांची गैरसोय आता संपली आहे. या पुलासाठी पाठपुरावा केल्याबद्दल परिसरातील ग्रामस्थांनी पुलाच्या लोकार्पण सोहळ्यात आमदार श्री. धिरज देशमुख यांचा जाहीर सत्कार केला व त्यांचे आभार मानले. 'लातूर ग्रामीण'मधील गावांमध्ये विकासाची प्रक्रिया सतत सुरू राहील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी ग्रामस्थांना दिली.

# श्रावस्ती बुद्ध विहारात जागतीक महिला दिन



लातुर : - श्रावस्ती बुद्ध विहारात जागतीक महिला दिन साजरा. श्रावस्ती बुद्ध विहार ट्रस्ट संचलीत श्रावस्ती बुद्ध विहारात आज सायंकाळी ठिक ६:००वाजता कुसुम बानाटे यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रमुख पाहुणे सुजाता अजनीकर,चेअरमन,दी पिपल्स महिला नागरी सहकारी पतसंस्था लातुर यांच्या ऊपस्थितीत बुद्ध,भिमाच्या नि सावित्रीमाई व रमाईच्या प्रतिमेचे धुप,दिप पुष्पाने वंदन करून ज्योती घारगावकरच्या नेतृत्वात बुद्ध वंदना घेतली.मग पाहुण्यांचे व ऊपस्थित सर्वच महिलांचे गुलाब पुष्प आणि पेढा भरवुन स्वागत करत मंगल शुभेच्छा दिल्या. यावेळी सुजाता अजनीकरांनी महिलांना बचतीचे महत्व स्वावलंन,समृद्धी,निर्भय संसार सुखासाठी महत्वाचे आहे.म्हणुन बचत करण्याचा सल्ला दिला.तर स्विटी शहा या बालीकेने व संजीवनी गुंजुरगेंनी आपले विचार मांडले.प्रास्ताविक,संचलन करत विहाराचे सचीव विलास घारगावकरांनी बुद्ध,भिम रमाई नि सावित्री जिजाऊचे विचारच आपल्याला निर्भय,समृद्ध,सन्मानीत करणार आहेत.तोच विचार जगावा असे आवाहन करत शुभेच्छा दिल्या.यावेळी महिलांची ऊपस्थिती प्रशंसनीय होती.

## आरोग्य आणि शिक्षण योग्य वेळेत मिळाल्यास समाजाची आर्थिक प्रगती होऊ शकते.

मुंबई :- आरोग्य आणि शिक्षण योग्य आणि वेळेत मिळाल्यास समाजाची आर्थिक प्रगती होऊ शकते या विश्वासाने समता फाऊंडेशन या संस्थेचे अध्यक्ष ॲड.प्रमोद सागर तायडे यांनी या संस्थेची उभारणी केली आहे.या संस्थेच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांचा आर्थिक,सामाजिक आणि सांस्कृतिक विकास व्हावा या उद्देशाने लोकांचे प्रश्न जाणून घेणे,त्यांचे संघटन उभारण,विविध प्रशिक्षण आणि जागृतीपर शिबिर,आरोग्य शिबिर,विविध व्होकेशनल कोर्सेस राबवले जात आहेत.तसेच त्यांचे बचत गटात रूपांतर करून उद्योग प्रशिक्षण देण्यात येत आहे.महिलांचे नेतृत्व विकास करण्याचे कार्य संस्थेमार्फत केले जात आहे.

आजमितीस समताचे महिला बचत गटात मोठे काम असून संस्थेचे ७५ पेक्षा जास्त नोंदणीकृत बचत गट आहेत.या माध्यमातून ८५० पेक्षा जास्त महिला आणि त्यांचे कुटुंब जोडलेले आहे.समता चे कार्य मुंबई उपनगरे,ठाणे,दिवा,कल्याण आणि इगतपुरी या ठिकाणी सुरू आहे.बचत गटाच्या माध्यमातून महिलाना उद्योग प्रशिक्षण देत असून महिला बचत गटाचे क्लिनिग उत्पादने जसे टॉयलेट क्लीनर,फ्लोअर क्लीनर,डिश वॉशर (भांडी घासण्याचे लिक्विड) तसेच अगरबत्ती,धूप आणि परफ्यूमचे स्वतःचे उत्पादन असून उत्पादन निर्मिती आणि विक्री त्या स्वतः करीत आहेत. या माध्यमातून महिलांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

संस्थेचे अध्यक्ष हे व्यवसायाने वकील असून संस्थेतील इतर ट्रस्टीसुद्धा व्यवसायाने वकील आणि उद्योजक असल्याने त्याचा फायदा बचत गटातील महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी होत आहे.आपणास आवहान करण्यात येते की, संस्थेचे कार्य निरंतर सुरू राहावे आणि महिलांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने आम्ही सन्मान स्त्री शक्तीच्या कर्तृत्वाचा या थिमवर महिलांचा मेळावा आयोजित केला आहे.या मेळाव्यास आपण आर्थिक सहकार्य करावे ही विनंती.सोबत क्यू आर कोड देत आहे आपणाकडून येणारी देणगी कर सवलत पात्र राहील.अधिक माहिती करीत नेहा मालुसरे ९६१९४५२१५४ समन्वयक यांच्याशी संपर्क साधावा.

# जे.जे. रुग्णालयात उभारणार आणखी दोन कॅथलॅब

मुंबई : महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून उपचारासाठी येणाऱ्या गरीब व गरजू रुग्णांना अत्यल्प दरात अँजिओप्लास्टीची सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता जे.जे. रुग्णालयातील कॅथलॅबचे नुकतेच अद्ययावतीकरण करण्यात आले. मात्र अधिकाधिक नागरिकांना अद्ययावत सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी जे.जे. रुग्णालयामध्ये या वर्षात आणखी दोन कॅथलॅब उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे हृदयाविकार असलेल्या रुग्णांना दिलासा मिळू शकेल.मुंबईतील सर्वाधिक अँजिओप्लास्टी शस्त्रक्रिया जे.जे. रुग्णालयात करण्यात येतात. मात्र मागील काही दिवसांपासून जे.जे. रुग्णालयाच्या कॅथलॅबमधील दोनपैकी एक यंत्र बंद होते. राज्य सरकारने नुकतेच या केंद्राचे अद्यायवतीकरण केले. या केंद्रात एक नवीन यंत्र आणण्यात आले. या अद्ययावत कॅथलॅबमुळे सर्वसामान्य रुग्णांना अँजिओप्लास्टीसाठी निश्चितच फायदा होणार आहे. जे.




जे. रुग्णालयातील कॅथलॅबच्या अद्ययावतीकरणामुळे दररोज अँजिओप्लास्टी, अँजिओग्राफी आणि हृदयाची झडप बदलण्याच्या १५ शस्त्रक्रिया करणे शक्य होणार आहेत. दरवर्षी पाच हजार रुग्णांवर शस्त्रक्रिया होणार आहेत. त्यामुळे यापुढे रुग्णांना अधिक चांगले उपचार मिळण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.रुग्णालयातील येणाऱ्या रुग्णांची संख्या लक्षात घेता आता जे.जे. रुग्णालयामध्ये या वर्षांमध्ये आणखी दोन कॅथलॅब सुरू करण्यात येणार आहेत. यामुळे महाराष्ट्रातील कानाकोऱ्यातून येणाऱ्या गरीब आणि गरजू रुग्णांना जिओप्लास्टीची सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध करुन देणे शक्य होईल, असे जे.जे. रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. पल्लवी सापळे यांनी सांगितले. या दोन कॅथलॅबसाठी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सर्वतोपरी सहकार्य आणि आर्थिक निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिल्याचेही डॉ. सापळे यांनी सांगितले.

## अंबरनाथ मधील शिवमंदिर यात्रेत लाखो भाविकानी घेतले दर्शन

उल्हासनगर / प्रतिनिधी : अंबरनाथ येथील प्राचीन शिवमंदिरात महाशिवरात्रीनिमित्त भरलेल्या यात्रेत पाच लाखो भाविकानी येवुन शंकर भगवान चे दर्शन घेतले आहे. यावेळी अंबरनाथ नगरपालिका, स्थानिक पोलिस तसेच वाहतुक पोलिसांनी चोख बंदोबस्त लावत कोणता ही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घेतली . दरम्यान . यात्रे निमित्त अंबरनाथ, उल्हासनगरमधील अनेक मार्गावर वाहतुकीत बदल करण्यात आला होता . तसेच भाविकांच्या सुरक्षिततेसाठी यात्रा मार्गावर सीसीटीव्ही, गाभाऱ्यातील दर्शन सुरक्षित व्हावे म्हणुन सी सी कॅमेरे लावन्यात आले असुन शहरात विविध ठीकाणी एलईडी लावण्यात आले. अंबरनाथच्या येथील प्राचीन शिव मंदिरात दरवर्षी महाशिवरात्री निमित्त ठाणे जिल्ह्यातील सर्वात मोठी यात्रा भरते. या यात्रेनिमित्त जिल्ह्यातून जवळपास चार ते पाच लाख भाविकानी येवुन महादेवाचे दर्शन घेतले. दरम्यान यात्रेचे नियोजन करण्यासाठी पालिका प्रशासनाकडून यात्रेच्या मार्गातील नियोजन तसेच पोलीस प्रशासनाकडून यात्रे दरम्यान कायदा सुव्यवस्था सांभाळण्याबाबत पोलीस यंत्रणा सज्ज करण्यात आली. काल संध्याकाळपासूनच शिवाजी चौक ते शिवमंदिरा पर्यंतच्या मार्गावर यात्रेचे साहित्य विकणार्यांनी आपली दुकाने थाटली होती . तसेच शिवमंदिराच्या आवारातही आवश्यक त्या उपाय योजना नगरपालिकेने केल्या होत्या . दरम्यान शिवरात्रीचे औचित्य साधत अंबरनाथ उल्हासनगर मध्ये जागो जागी प्रसाद वाटप शरबत वाटप तसेच पाव भाजी थंड पेय वाटप करण्यात आले होते. तर जागो जागी शंकरजीच्या प्रतिमा लावुन पुजन करण्यात आले. या यात्रेला महिला पुरुषांसह लहान मुलांची गर्दी अधिक प्रमाणात दिसत होती. या यात्रेत नगरपालिका प्रशासन पुर्णपणे सज्ज असल्याचे दिसुन आले असुन यात्रा मार्गावर २५ सी सी कॅमेरे लावन्यात आले आहेत. शहरातील विविध चौकात स्क्रीन बसन्यात आले होते त्यामुळे भाविकाना दर्शन घेन्यास सुलभ झाले आहे. दरम्यान मंदिराच्या आवारात दोन रुग्णवाहीका सज्ज ठेवन्यात आल्या होत्या . मात्र कोणताही अनुचित प्रकार घ्डला नसल्याने आयोजकानी समाधान व्यक्त केले आहे.

## २३४ प्रवाशांना घेऊन विमानाचे उड्डाण, मात्र हवेतच निखळले चाक

सॅन फ्रान्सिस्को : सॅन फ्रान्सिस्कोहून उड्डाण घेत असताना टायर निखळल्याने जपानला जाणारे युनायटेड एअरलाइन्सचे जेटलाइनर गुरुवारी लॉस एंजेलिसमध्ये उतरले. या विमानात २३५ प्रवासी होते तसेच १४ क्रू मेंबर होते. विमानाच्या डाव्या बाजूच्या मुख्य लँडिंग गियर असेंब्लीवरील सहा टायरपैकी एक टायर निखळला. हे टायर खाली पार्किंगच्या जागेत असलेल्या कारवर पडल्याने कारचे मोठे नुकसान झाले आहे.विमानाने उड्डाण घेताच काही सेकंदात विमानाचा एक टायर निसटल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात शेअर केला जात आहे. या घटनेत कोणीही जखमी झाले नाही. टायर सॅन फ्रान्सिस्को आंतरराष्ट्रीय विमानतळावरील कर्मचा-यांच्या पार्किंगमध्ये पडला. यामुळे कारची मागच्या बाजूचा चक्काचूर झाला आहे. या प्रकरणाची चौकशी सुरु आहे.एका निवेदनात, एअरलाइनने म्हटले आहे की २००२ मध्ये डिझाईन केलेले हे विमान निखळलेल्या किंवा खराब झालेल्या टायरसह सुरक्षितपणे उतरण्यासाठी डिझाइन केले होते. या घटनेची पुढील चौकशी फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशनकडून केली जाईल, असे असोसिएटेड प्रेसने म्हटले आहे. बोईंग ७७७-२००चे टायर विमानाने उड्डाण केल्यानंतर काही सेकंदात निखळले तेव्हाचा क्षण व्हिडिओ फुटेजमध्ये कॅप्चर करण्यात आला.

## उल्हासनगर येथील अनधिकृत बांधकाम व नियमितीकरणाचा प्रश्न मार्गी लागणार

उल्हासनगर / प्रतिनिधी : उल्हासनगर अनधिकृत बांधकामे व नियमिततेचा प्रश्न आणि इतर विषयांबाबत काल मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथील वर्षा या शासकीय निवासस्थानी महत्त्वाची बैठक पार पडली. यावेळी या सर्व विषयांवर अनेक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आले असुन त्या मध्ये शहरातील नियमितीकरण व अनधिकृत बांधकामे या बाबत चांगला निर्णय घेतल्याने शहरातील नागरिकानी समाधान व्यक्त केले आहे. उल्हासनगर येथील अनधिकृत इमारती नियमानुकूल करण्यासाठी शासनाने कायदा केला आहे. मात्र त्यात भूखंड नियमित करण्यासाठीचा दंड अधिक असल्याने त्यासाठी रहिवाशी पुढे येत नव्हते. हा दंड कमी करून पुनर्विकासासाठी रहिवाशांना प्रोत्साहन देण्यासाठी लवकरच सकारात्मक निर्णय घेतला जाणार असून त्याबाबतचा प्रस्ताव लवकरच कॅबिनेटमध्ये मांडला जाणार आहे. यामुळे उल्हासनगर येथील अनधिकृत आणि जीर्ण झालेल्या इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.

उल्हासनगर शहरातील पुनर्विकास हा क्लस्टर योजनेच्या माध्यमातूनही करता यावा, यासाठी क्लस्टरमधील या आधीची १० हजार चौरस मीटरची असलेली अट शिथिल करून ४ हजार चौरस मीटर करण्याचा देखील ऐतिहासिक निर्णय मुख्यमंत्री शिंदे महोदयांनी घेतला आहे. यावेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, शिवसेना आमदार डॉ.बालाजी किणीकर, मनसेचे आमदार राजू पाटील, शिवसेना जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे, युवासेना सचिव दिपेश म्हात्रे, उपजिल्हा प्रमुख अरुण आशान, शिवसेना नेते नानासाहेब बागुल , दिवा शहरप्रमुख रमाकांत मढवी, कल्याण तालुका प्रमुख महेश पाटील, स्थानिक पदाधिकारी, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव भूषण गगराणी, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव के. गोविंदराज, कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड, उल्हासनगर महापालिका आयुक्त अजीज शेख, विविध विभागांचे प्रधान सचिव, अप्पर सचिव, सचिव यांच्यासह २७ गाव समितीचे आणि १४ गाव समितीचे विविध पदाधिकारी तसेच विविध महापालिकांचे अधिकारी, आर्किटेक्ट आणि सीए संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या नुकसानीची भरपाई करण्यासाठी वनविभाग कटीबद्ध - वनपरिक्षेत्र अधिकारी प्रमोद राठोड

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) वन्य प्राण्यांची वाढती संख्या व त्यांच्यापासून शेतकऱ्यांचे केलेल्या नुकसानीची भरपाई करण्यासाठी वनविभाग कटीबद्ध आहे. शेतकऱ्यांनी फक्त नुकसानीचा फोटो, शेतीचा सातबारा, टोच नकाशा आणि होल्डींगसह ऑनलाईन करणे अनिवार्य आहे. शेतकऱ्यांनी डगमगून न जाता नुकसान भरपाईसाठी पुढे येण्याचे आवाहन किनवट वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रमोद राठोड यांनी केले आहे.



जंगल परिसराला लागून असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे वन्य प्राण्यांकडून प्रचंड नुकसान केले जात असल्याच्या घटना नेहमीच ऐकायला मिळतात. बऱ्याच वेळेस शेतकरी नुकसान भरपाई मिळवण्यासाठी पुढे येत नाही. यापुढे शेतकऱ्यांनी वनविभागाकडे न येता थेट ऑनलाईन मागणी केली तरी त्यांच्या खात्यात नुकसान भरपाई रक्कम टाकल्या जाणार आहे. अतिदूर्गम, डोंगराळ व ग्रामिण भागातील शेतकरी बऱ्याच वेळी वनविभागाशी संपर्क करु शकत नसल्याच्याही समस्या ऐकायला मिळतात. म्हणून यापुढे शेतकऱ्यांनी फक्त होल्डींग, टोच, सातबारा, बँक खाते हे त्यांच्या सोयीनुसार कुठूनही ऑनलाईन करु शकणार आहेत. ऑनलाईन मागणी प्राप्त होताच वनपरिक्षेत्राधिकारी, वनपाल, वनरक्षक स्थळ तपासणीसाठी आल्यास त्यांना सहकार्य करावे लागणार आहे. सर्व कागदी सोपस्कार पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसान भरपाईची रक्कम अदा केली जाणार आहे. या संधीचा शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन परिक्षेत्राधिकारी राठोड यांनी केले आहे. थोडेफार नुकसान झाले तरी बळीराजा नुकसान सहनच करतो. पायपीट नको म्हणून शेतकरी नुकसान भरपाईच्या मागणीकडे दूर्लक्ष करतो. ऑनलाईन सुविधेमुळे शेतकऱ्यांचा नुकसान मागणीकडे कल वाढणार काय ? हे पहाणे सुद्धा तेवढेच महत्वाचे ठरणार आहे.

# माझ्या कमाईतील हा खारीचा वाटा वंचितांच्या लढ्यासाठी!

नवी मुंबई :- वंचित बहुजन आघाडीच्या परिवर्तन लढ्यासाठी नागाबाई लोखंडे या ज्येष्ठ माऊलीने आपल्या पेन्शनमधील एक लाख रुपये आज ड.बाळासाहेब आंबेडकर यांच्याकडे सुपूर्द केले.त्या पुसद तालुका जिल्हा यवतमाळ येथील रहिवाशी आहेत. सध्या त्या गोरेगाव मुंबई येथे राहतात.वंचित बहुजन आघाडीच्या राज्यभर महासभा होत आहेत.या सभांना लाखोंच्या संख्येने जनसमुदाय स्वतःच्या पैशाने आणि स्वतःची भाजी भाकरी घेवून येतो. कुणासाठी गाडी पाठवली जात नाही,ना कुणाला पैसे देवून आम्ही गर्दी जमवत नाही.स्वाभिमानी जनता तन मन आणि धन देवून बाळासाहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे.सत्ता परिवर्तनाचा लढा बळकट करण्याची धमक फक्त



आणि फक्त अशा दिलदार आणि स्वाभिमानी जनतेमध्ये आहे.

बाबासाहेबांनी आम्हाला स्वाभिमानाने आणि ताठ मानेने जगण्याचा अधिकार दिला आहे. आता आम्ही कुणाचे गुलाम म्हणून मेंढरासारखे जाणार नाही,तर या निवडणुकीत आम्ही सत्ता परिवर्तन घडवणारच हा विश्वास या माऊलीने या स्वतःच्या कमाईतील खारीचा वाटा बाळासाहेबांना देवून दाखवला आहे.आपण ही या सत्ता परिवर्तन लढ्यात यथाशक्ति आर्थिक मदत करून स्वाभिमानी बनावे.महिला दिनाच्या पूर्वसंध्येला या माऊलीसारख्या हजारो माऊलींना सलाम..!.

# भाजपाच्या ४८ जागा कमी करण ही आपली जबाबदारी; ॲड प्रकाश आंबेडकर मुलुंड मधील सभेत उपस्थित जनसमुदायांना आवाहन.

**तर राहुल गांधींना पुढे करू नका.**

काँग्रेसवाल्यांना सांगणं आहे मोदींना अंगावर घ्यायचा असेल, तर राहुल गांधीना पुढे करू नका. प्रियंका गांधीना पुढे करा, ती बरोबर ४-५ वाजवत असते, मोदीची पोल खोल करणे हे महत्वाचे आहे .असंही ॲड. प्रकाश आंबेडकरांनी सांगितले.




मुंबई /शहामत शेख. लोकसभा निवडणूक लागणार आहेत ४०० पार जागा निवडून आणणार आहेत अशी मोदींनी घोषणा केली आहे. आता ४०० पैकी ४८ जागा महाराष्ट्रात आहेत या जागा कमी करणे ही आपली जबाबदारी आहे असे आव्हान वंचित बहुजन आघाडीचे नेते श्रद्धेय एडवोकेट प्रकाश आंबेडकरांनी दिनांक०८ मार्च रोजी मुलुंड येथील सभेत उपस्थित जनसंमुदायास संबोधले. मुंबई मुलुंड येथील लोकशाही गौरव महासभेत ते बोलत होते एड बाळासाहेब आंबेडकर म्हणाले की ४०० पैकी ४८ कमी झाल्यावर ३५२ जागा राहतात, त्यामुळे ४८ जागा कमी करण ही आपली जबाबदारी आहे. उद्या युती होईल की नाही हे डोक्यातून काढून टाका, झाली तर फारच चांगली, नाही झाली तर आपल्याला लढायचं आहे, हे लक्षात असलं पाहिजे.जेवढ्या ताकतीने आपण उतरू तेवढ्याच ताकतीने इतर पक्ष समूह भाजपाच्या विरोधात आहे.तो आपल्याला मदत केल्याशिवाय राहणार नाही. तरी आपण लढणार असे त्यांनी सांगितले. त्याशिवाय मोदी असेल अथवा भाजपा यांना अंगावर आपणच घेतले आहे.इतरांचे खोके चाललेत त्यापलीकडे काहीच नाही. मोदी घराणे शाहीवर बोलतात, देशातील जनता हा माझा परिवार आहे असं सांगता, मग हे खरे असेल तर एकच गोष्ट करावी, निवडणूक प्रतिज्ञा पत्रात तुम्ही तुम्ही लग्न झाल्याचं जाहीर केलं. त्यामुळे त्या महिलेला एक दिवस तरी पंतप्रधान निवासस्थानी ठेवा .मग तुम्ही १४० कोटी लोकाचा बाप आहे ते म्हणू. राजकीय घराणेशाहीवर बोलताना पण समाज व्यवस्थेत घरातील जी अवस्था आहे ,ती आपण पाळत नाही अशी टीका एड. प्रकाश आंबेडकर पंतप्रधान नरेंद्र मोदी वर केली. दरम्यान जुनागड येथील बंदरात १९ हजार कोटीचा नार्कोटेकचा ड्रग्स साठा सापडला. ज्याचा मालक अफगान दाखवला, तो फाटका आहे. आपली सत्ता गेली तर आपण जेलमध्ये जाऊ त्यामुळे ते लटलट कापायला लागलेत. महाराष्ट्रच्या राजकारणात भाजपाचा झेंडा दिसत नाही, भाजपाचे नावही दिसत नाही. सबकुछ मोदीच्या नावावर आहे. अशी परिस्थिती आहे.२०२४ निवडणुकीत मोदी निवडून आले तर, त्यांचे वागणे व्यापाराच्या मागे ईडी सीबीआयच्या व्यापाऱ्यांच्या घरावर धाडी पडल्याशिवाय राहणार नाही. असा इशारा एड. प्रकाश आंबेडकरांनी दिला.

## कै. रसिका महाविद्यालयात हिंदी विभागाचे विविध उपक्रम



देवणी : येथील कै. रसिका महाविद्यालयामध्ये हिंदी विभागातर्फे वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त काव्यपठन, कथाकथन, दोहा व भाषण स्पर्धा घेण्यात आल्या. काव्य कथन स्पर्धेमध्ये बी.कॉम. प्रथम वर्षाची विद्यार्थिनी दवणे स्वाती ज्ञानोबा ही प्रथम आली. मोरे पल्लवी भीम व बोडरे आनंद बापूराव या विद्यार्थ्यांनी द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला. दोहा पठन या स्पर्धेमध्ये धनेगावे श्रावणी महेंद्र या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक पटकाविला असून मोतीरावे सोनाली तानाजी यांनी दुसरा तर म्हेत्रे राधा बापूराव यांनी तृतीय क्रमांक मिळविला आहे. स्नेहसंमेलन कार्यक्रमांमध्ये भाषण स्पर्धा देखील ठेवण्यात आली होती या स्पर्धेमध्ये माने स्नेहा संजय प्रथम तर मोरे मोनिका व बोरोळे प्रणिता यांनी द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. हिंदी साहित्य या विषयावर घेण्यात आलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत बी.एस्सी. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी जोहरा मणियार यांनी जिंकली. हिंदी विभागाचे विभाग प्रमुख प्रा. धनराज बिराजदार यांनी प्राचार्य डॉ.चंद्रकांत जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या या स्पर्धे साठी परिक्षक म्हणून प्राणीशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. पी.आर. मोरे व मराठी विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रशांत भंडे उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रकांत जावळे यांनी स्पर्धेतील सर्व विजेत्यांसह सहभागींचे अभिनंदन केले.

## सर्वपक्षीय नेत्यांनी लोकसभा निवडणुकीत आपल्याला बिनविरोध निवडून द्यावे : रघुनाथ बनसोडे



लातूर : लातूर राखीव लोकसभा निवडणुकीत प्रमुख राजकीय पक्षांनी मतदार संघाबाहेरचा उमेदवार मतदारांवर न लादता आपण मागच्या तीन दशकांपासून आपण लोकचळवळीच्या माध्यमातून सामाजिक कार्यात अग्रेसर असल्याने आपल्याला सर्वपक्षीय नेत्यांनी लोकसभा निवडणुकीत बिनविरोध निवडून द्यावे असे आवाहन माजी नगरसेवक रघुनाथ बनसोडे यांनी शुक्रवारी लातुरात पत्रकारांशी बोलताना केले. लातूर लोकसभा मतदार संघ आरक्षित झाल्यापासून या मतदार संघाचा विकास ठप्प झाला आहे. सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण असलेले उमेदवार न देता पैसेवाले, कंत्राटदार उमेदवार मतदारांच्या माथी मारण्याचे काम आतापर्यंत झाले आहे. यापुढील काळात तरी असे प्रकार घडता कामा नये याकरिता आपण येऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीच्या आखाड्यात उतरण्याचा निर्णय घेतला आहे, असे सांगून रघुनाथ बनसोडे पुढे म्हणाले की, गोरगरिबांच्या समस्यांची जाण असलेला उमेदवार या मतदार संघासाठी निवडून देणे आवश्यक आहे. या मतदार संघातील अनेक सुशिक्षित बेरोजगार युवक कामाच्या शोधासाठी अन्य ठिकाणी स्थलांतरित झाले आहेत. त्यांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याऐवजी आजचे लोकप्रतिनिधी आपल्याला उमेदवारी मिळवून देणाऱ्या नेत्यांच्या इशाऱ्यावर काम करताना दिसतात. बाहेरच्या उमेदवाराला झोपेतून उठवून आणून सामान्य मतदारांवर लादण्याचे काम यापुढील काळात होता कामा नये, अशी सामान्य मतदारांची भावना झालेली आहे. सामान्यांच्या मनातील ही खदखद आपण व्यक्त करत असल्याचे बनसोडे यांनी सांगितले. आपण सामाजिक तसेच प्रसार माध्यमातही कार्यरत आहोत. निवडणुका आल्या की प्रमुख राजकीय पक्षांना पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते दिसत नाहीत. निष्ठावान कार्यकर्त्यांकडे अमाप पैसे नसल्याने नेत्यांकडूनच उमेदवारीबाबत त्यांच्यावर अन्याय का ? असा सवालही बनसोडे यांनी उपस्थित केला आहे. जिल्ह्यातील प्रमुख राजकीय पक्षांनी आपापसातील मतभेद बाजूला सारून यावेळी उमेदवारी देताना मतदार संघातील प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करू शकणाऱ्या, सामान्यांच्या प्रश्नांची नाळ ओळखून चालणाऱ्या आपल्यासारख्या तळमळीने सामान्यांसाठी कार्य करू शकणाऱ्या व्यक्तिमत्वाला उमेदवारी देऊन ही निवडणूक बिनविरोध होण्यासाठी प्रयत्नशील रहावे . पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करताना आपण पत्रकार बांधवांनाही किती समस्यांना सामोरे जावे लागत आहे, याचा जवळून अभ्यास केला आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ समजल्या जाणाऱ्या या क्षेत्राच्याही ज्या महत्वपूर्ण समस्या आहेत, त्याची सोडवणूकही आपण आपल्याला संधी मिळाल्यास करण्यास कटिबद्ध आहोत. लातूरकरांनी आपल्यावर अलोट प्रेम केले आहे. १९९६ व २००६ च्या नगर परिषद निवडणुकीत मतदारांनी मला एक पैसाही खर्च न करता निवडून दिले होते. सामान्य लोकांसाठी मी अहोरात्र कार्य करणारा कार्यकर्ता आहे. भारतीय संविधानाला अनुसरून काम करणाऱ्या राजकीय पक्षांनी एकत्रित येऊन आपल्याला बिनविरोध लोकसभेवर निवडून द्यावे,अशी अपेक्षाही रघुनाथ बनसोडे यांनी व्यक्त केली .

## तलाठ्यांच्या वरदहस्तामुळे सर्रास गौणखणीजाचे उत्खनन,





किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) पैनगंगेतील रेती घेऊन धानोर्याकडे जात असतांना तलाठ्यांनी पिंपरी गावात रेतीसह ट्रॅक्टर पकडून सोडून दिल्याच्या घटनेनंतर जोरदार चर्चेला उधान आले आहे. सहायक जिल्हाधिकारी आणि तहसिलदार आणि अधिकाऱ्यांनी रेती तस्करीवर आळा घालण्याची गरज आहे. गौणखनिज उत्खननावर नियंत्रण ठेवण्याची काळाची गरज आहे. कांही ठिकाणच्या तलाठ्यांच्या वरदहस्तांमुळेच सर्रास गौणखनिजाचे उत्खनन चालू आहे. पैनगंगेच्या रेतीघाटातील उत्खननावर अभयारण्य खरबी प्रशासनातील कांहींची मुकसंमती असल्याची त्या त्या परिसरात चर्चा ऐकायला मिळत आहे. पैनगंगेलगतच्या सर्वच गावातून आणि परिसरातील कांहींचा रेती तस्करी हा मुख्य व्यवसाय बनला आहे. त्या त्यि परिसरातील तलाठ्यांना सदरची बाब अवगत असतांनांही त्यांनी तहसिल कार्यालय आणि सहायक जिल्हाधिकारी कार्यालयात तशी माहिती पुरऊन कायम बंदोबस्त करण्याची मागणी केली काय ? हा महत्वाचा विषय ठरतो. सहायक जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी धडाकेबाज कारवाया केल्यानंतर तस्करांना सळो की पळो करून सोडले होते. दरम्यान तस्करीवर असतांनासुद्धा फितुरांकडून तस्करांना तंतोतंत माहिती पुरवल्या जात होती. आता आतातर महिला अधिकारी असल्याने त्यात अधिकची भर पडण्याची अनेकांनी भीती व्यक्त केली आहे. मोठ्या प्रमाणात आवर बसला होता. त्यांच्या बदलीनंतर पुन्हा हे धंदे फोपावलीत. म्हणून रेतीच्या गाड्या धरणे आणि सोडून देण्याचे प्रकार वाढल्याचे अनेकांचे मत आहे. पिंपरी गावात तलाठ्याने केलेला प्रकार हा त्यातील एक असल्याची चर्चाही आहे आणि सुत्रांद्वारे देखिल ऐकायला मिळते. पैनगंगेच्या पांधरा, मारेगाव, येंदा, भूलजा, मदनापूर, पिंपरी अशा विविध रेतीघाटातून रेतीचे उत्खनन चालू आहे. खरबी वनविभाग आणि किनवटच्या महसूल विभागाच्या झारीतील कांही शुक्राचार्यांच्या वरदहस्ताचा हा परिणाम आहे. महिला आधिकारी कार्यालयीन वेळेच्या नंतर रेती तस्करी रोखण्यासाठी ग्रामिण भागापर्यंत पोहोचूच शकणार नाहीत. पुरुष अधिकारी

## कन्नड सहकारी साखर कारखाना 'ईडी'ने केला जप्त

छत्रपती संभाजीनगर : राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे नातू आणि आमदार रोहित पवार यांच्या बारामती ॲग्रो कंपनीने खरेदी केलेला कन्नड सहकारी साखर कारखाना ईडीने जप्त केला आहे.आगामी लोकसभा निवडणुकीआधी ईडीची ही सर्वात मोठी कारवाई आहे. ईडीने शिखर बँक घोटाळा प्रकरणी ही कारवाई केली. या प्रकरणी गेल्या अनेक दिवसांपासून ईडीची कारवाई सुरु होती. ईडीने या प्रकरणी अनेक ठिकाणी छापेमारी देखील केली. त्यानंतर आता कन्नड सहकारी साखर कारखाना जप्त करण्याची कारवाई करण्यात आली.ईडीने शिखर बँक घोटाळा प्रकरणी कन्नड सहकारी साखर कारखाना जप्त केला. या जप्त केलेल्या कारखान्याची किमत ही ५० कोटी २० लाख इतकी आहे. या प्रकरणी १६१ एकर जमीन ईडीकडून जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणात सर्वात आधी मुंबई पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणात राष्ट्रवादीचे अनेक नेते आरोपी बनवण्यात आले होते. रोहित पवार यांचीसुद्धा जवळपास ३ दिवस चौकशी झाली होती.

# मोदी हा देशाचा प्रधानमंत्री नसुन तो गुजरातचा खोटारडा पंतप्रधान आहे..! ॲड. बाळासाहेब आंबेडकर

नवी मुंबई / के. एच. हनवते :- दिनांक : ६ मार्च २०२४ रोजी नेरूळ नवी मुंबई येथील सत्ता परिवर्तन महासभेला वंचित बहुजन अघाडी राष्ट्रीय नेते अँड. बाळासाहेब आंबेडकर यांचे आगमन होताच सर्व उपस्थित जनसमुदयाने बाळासाहेब आंबेडकर यांचे टाळ्यांच्या गजरात हार्दिक स्वागत केले. त्यावेळी उपस्थित जनसमुदयातुन एकच नारा आब की बार आंबेडकर सरकार ..! अता फक्त बा... भिमाच रक्त काबीज करू दिल्लीचे तक्त..!! या घोषणेने सारा परिसर दणाणून गेला. नवी मुंबई येथील सत्ता परिवर्तन महासभेला संबोधीत करताना बहुजन हृदयसम्राट, लोकप्रिय - लोकनेते, अँड. प्रकाशजी तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी वरिल उदगार काढून मिशन २०२४ चा जाहीर निर्धार केला. सत्ता परिवर्तन महासभेला संबोधीत करताना बाळासाहेब आंबेडकर म्हणाले की, नरेंद्र मोदी हा खोटारडा पंतप्रधान आहे त्यांनी सारा देशच विकायला काढला आहे. ते ब्लॅकमेलिंगचे राजकारण करत आहेत, फोडा तोडा आणि राज्य करा आसी त्यांची हिटलरी हुकूमशाहीची निती आहे या दहा वर्षांत मोदीने गुजरातमधे किती ? धाडी टाकल्या हे त्यांनी स्पष्ट सांगावे. महाराष्ट्रातील कारखाणे, सरकारी ऑफिस इत्यादी सार काही गुजरातला पळवले जात आहे. इव्हीएम मधे चिटींग करून सालो साल सत्तास्थानी रहायचे हा मोदींचा खेळ आहे आणि म्हणून अता सर्व वंचित बहुजन समाजाने हे सारे कटकारस्थान लक्षात घेऊन एकतेची वज्रमूठ निर्माण करा व वंचित बहुजन अघाडीला साथ द्या, अतापर्यंत आम्ही सत्तेत जाण्याचा कधीच प्रयत्न केला नाही पण यावेळी आम्ही सत्तेत पोहोचणार..! तुम्ही मला साथ द्या मी तुम्हाला सत्ता देतो..! त्या वेळी जनसमुदयातुन एकच नारा आबकी बार आंबेडकर सरकार.! चा जयघोष झाला. या महासभेला महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रेखाताई ठाकुर, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सिद्धार्थ मोकळ, महाराष्ट्र प्रदेश युवा अध्यक्ष निलेश विश्वकर्मा, मुंबई प्रदेश आनंद जाधव, ट्रॉम्बे तालुका अध्यक्ष सतीश राजगुरू, अँड. संदेश मोरे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते. या महासभेला संबोधीत करताना महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सरोजीत बणसोडे यांनी नेहमी प्रमाणेच आपल्या जोरदार भाषणात म्हणाले की, का..? करता तळ्यात - मळ्यात अता फक्त प्रधानमंत्री पदाचा हार बाळासाहेब आंबेडकरांच्या गळ्यात..! हा संकल्प करून आपण साऱ्यांनी कामाला लागले तर नक्कीच महाराष्ट्रात - देशात फुले, शाहु, आंबेडकर यांच्या विचारांचा विजय होईल. ते पुढे आसे ही म्हणाले की, या वर्षी जयंती नाचून नाही तर संविधान वाचुन सत्ता संपादन करणार..! हाच आमचा एकमेव निर्धार आसला पाहीजे. या सत्ता परिवर्तन महासभेचे आयोजक वंचित बहुजन अघाडी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : दिलीप (अभय) बंदीचोडे, यांनी या सत्ता परिवर्तन महासभेचे प्रस्ताविक भाषण केले. ते म्हणाले की, या वेळी वंचित बहुजन अघाडीचे राष्ट्रीय नेते : अँड. बाळासाहेब आंबेडकर यांना दिल्लीच्या संसद भवनात पाठवायचे आहे, त्यांना आपन सर्वांनी साथ देवुन वंचित बहुजन अघाडीला मजबूत करायचे आहे यापूर्वीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटलेच आहे की, राजकिय सत्ता हिच तुमच्या सर्व समस्यांची गुरू किल्ली आहे आणि ति प्राप्त करा..!, ज्या धर्माला राजाश्रय असतो तोच धर्म वाढतो..! आणि म्हणून क्रांती करण्याची हिच खरी नामी संधी चालून आलेली आहे. आपसी मतभेद विसरुन, गट - तट मातीत गाडून समस्त वंचित बहुजन सारे एक होऊ सत्ता आपल्या हाती घेऊ..!! या देशातील तमाम ८५% बहुजन समाजाने आपले सर्वांचे उध्दारकरते : प.पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपकाराची थोडीफार जाणीव आणि आपली एक सामाजिक बांधीलकी समजुन या राजकीय रथाला सर्वांनी सढळ हस्ते सहकार्य करून हा समतेचा रथ पुढे नेव्हा हिच एक तळमळतेची व नंम्रतेची विनंती. अता नाही तर कधीच नाही..! आपले संविधान सुरक्षित राहीले तरच आपला समाज सुरक्षित राहील..! आणि म्हणून संविधानात्मक लोकतंत्र - लोकशाही जिवंत राहीली पाहीजे असे ज्यांना ज्यांना वाटते त्यांनी मिशन २०२४ चा संकल्प करून वंचित बहुजन अघाडीमधे लाखोंच्या संख्येत सामील व्हावे व आपला स्वाभिमानी निडर नेता : अँड. बाळासाहेब आंबेडकर यांचे हात बळकट कराल हिच अपेक्षा. या महासभेला वंचितच्या नवी मुंबई महीला जिल्हाध्यक्ष शिल्पाताई रणदिवे, तसेच भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष जयवंत लव्हांडे (गुरूजी), पनवेल वंचित जिल्हाध्यक्ष डि. डि. गायकवाड, वंचीत चे युवा अध्यक्ष सुनिल कांबळे, इत्यादी पदाधीकारी उपस्थित होते. समाजसेवक : शरद सरवदे, सुनील भोले, गौतम शिलवंत, राजेश भालेराव, संतोष जाधव, प्रकाश मनवर, सतिश खंडाळे, राहुल जाधव, अशोक शिरसाट, गौतम चव्हाण, राहुल शिरसाट, दिलीप गायकवाड, सुभाष बलखंडे, सारंधर धवसे, वासमनी, बाबा मेहते, जवांदे, रवि सोनवणे, कल्याणराव हनवते, वसंत हनवते इत्यादी शेकडो कार्यकर्त्यांनी दिवस रात्र मेहनत केली. या सत्ता परिवर्तन महासभेला मुख्य आकर्षण समता सैनिक दलासह लाखोंच्या संख्येत भिम सैनिकांनी उपस्थित राहून हि सत्ता परिवर्तन महासभा यशस्वी केली. या संपूर्ण कार्यक्रमाचे भारदस्त सुत्रसंचालन रणरागीणी भिम कण्या : अर्चना मोहिते यांनी केले त्याबद्दल वंचितचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष दिलिप (भाई) बंदीचोडे यांनी सर्वांचे मनःपुर्वक जाहीर अभार व्यक्त करून कार्यक्रम संपन्न केला.

नवी मुंबईतील सत्ता परिवर्तन महासभेला लाखोंचा जनसमुदाय उसळला. सर्वांचा एकच नारा आबकी बार आंबेडकर सरकार...च्या घोषणेने सारा परिसर दुमदुमला.




PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE